गडचिरोली | लोकमत | मंगळवार, दि. ६ जानेवारी २००९

# सावंतांनी रेशनिंग तर सोहनींनी दिली शिक्षण, महिला सक्षमीकरणाची माहिती

गडचिरोली, दि.५ (शहर प्रतिनिधी)- शोधग्राम सर्च येथे निर्माणच्या शिबिरातील आजचा सहावा दिवस. महाराष्ट्रातून सर्व ठिकाणांहून यात युवक-युवती सामील झाले असून या शिबिराचा उद्या शेवटचा दिवस. रेशनिंग कृती समितीचे कार्यकर्ते सुरेश सावंत हे मुंबईहून आले होते. रेशनकार्ड किती लोकांकडे आहे, त्याचा उपयोग कशासाठी होतो यापासून तर नागरिकांना येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा झाली. यातूनच मिळणाऱ्या धान्याचे वितरण, त्यासाठीचा झगडा, त्यामागील राजकारण, उभा राहिलेला संघर्ष आणि त्यातून अडचणींवर सापडत गेलेले उपाय, जागतिक स्तरावरील व्यापाराबाबतची माहिती याबाबत सुरेश सावंत यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले.

भुकेचा आंतरराष्ट्रीय प्रश्न अन्न सध्या जग अरिष्टाच्या छायेत वावरत आहे. सबसिडी-अन्नाच्याबाबत रेशनिंगचा हस्तक्षेपाबद्दल रेशनिंगच्या योजनांमधील बदल रेशनिंगच्या समस्या, रेशनकार्ड, मध्यमवर्गाचे औदासीन्य ते



सर्च येथील निर्माण शिबिरात युवकांना रेशनिंगबद्दल माहिती देताना सोहनी.

का. रेशनिंगच्या लढ्याचे बारकावे व संघर्ष, वेगवेगळ्या भूमिकांचे लोक एकत्र येऊन सहमतीने कसं काम करतात. अंतिम ध्येय रेशनिंग बंद व्हावं. भुकेचा प्रश्न किती भीषण असतो याबाबत सुरेश सावंत यांनी सांगितले. आजच्या विषयाने सर्वच शिबिरार्थी अंतर्मुख झाले. आजचा दिवस आपण याबाबतची आठवण म्हणून सर्वचजणांनी उपवास करायचा निर्णय घेतला.

दुपारच्या सत्रात बायफ या संस्थेचे संचालक गिरीश सोहनी यांनी बायफ संस्थेची माहिती आणि आपला प्रवास याबद्दल शिबिरार्थींसोबत आपले अनुभव शेअर केले. महात्मा गांधींचे अनुयायी मणीभाई पटेल (बायफ संस्थेचे संस्थापक) हा प्रवास एकूणच विलक्षण होता. त्यांच्या प्रेरणेतून गिरीश सोहनींची वाटचाल सुरू आहे. कृषी आणि त्यासोबत शिक्षण, आरोग्य, पशुबळ, महिला सक्षमीकरण यासारख्या अनेक विषयांना स्पर्श केला. त्यांची ही वाटचाल व अनुभव शिबिरार्थींसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक होते.

आज शिबिरात शिबिरार्थ्यांसह डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग, डॉ. गिरीश सोहनी, कुमार केतकर, सुरेश सावंत, हिरामण वरखडे, सुबोध कुलकर्णी, अरुण देशपांडे, सुमंगल देशपांडे, नंदा खरे, विद्यागौरी खरे व कार्यकर्ते उपस्थित होते.